PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Aai Shakti Devta
Year: 2001

Song: Ek Bazu Aadimaya
Lyricist: Jagdish Khebudkar

एक बाजू आदिमाया
एक बाजू आदिशक्ती
खांद्यावर कावडीला
काठी झाली माझी भक्ती
वाजत गाजत तालात घुमत
सांजसकाळी
सप्तश्रुंगी दर्शनाला कावड निघाली
वाजत गाजत तालात घुमत
सांजसकाळी
हो सप्तश्रुंगी दर्शनाला कावड निघाली

कावड निघाली आईची कावड निघाली
कावड निघाली आईची कावड निघाली

ऊन वारा पावसात चालू अनवाणी
नाम जपू आईचं गाऊ तिची गाणी
ऊन वारा पावसात चालू अनवाणी
नाम जपू आईचं गाऊ तिची गाणी
तहानेला भान नाही भूक निमाली
कावड निघाली आईची कावड निघाली
कावड निघाली आईची कावड निघाली

आई तुझ्या रूपाचा ध्यास मला लागला
उदो उदो गजरानं भक्ती भाव जागला
आई तुझ्या रूपाचा ध्यास मला लागला
उदो उदो गजरानं भक्ती भाव जागला
पायाखाली मुक्तीची वाट मिळाली
कावड निघाली आईची कावड निघाली
कावड निघाली आईची कावड निघाली

विसाव्याला राहू थोडं घाट नागमोडी
भाजी भाकरीला आली अमृताची गोडी
विसाव्याला राहू थोडं घाट नागमोडी
भाजी भाकरीला आली अमृताची गोडी
आतुरली नजर लागे उंच आभाळी
कावड निघाली आईची कावड निघाली
कावड निघाली आईची कावड निघाली

त्रिखंडात आई तुझा महिमा गाजतो
घंटानाद संबळीचा गजर वाजतो
त्रिखंडात आई तुझा महिमा गाजतो
घंटानाद संबळीचा गजर वाजतो
मंदिराच्या कळसाची दिसली झळाळी
मंदिराच्या कळसाची दिसली झळाळी
कावड निघाली आईची कावड निघाली
कावड निघाली आईची कावड निघाली
कावड निघाली आईची कावड निघाली
कावड निघाली आईची कावड निघाली
कावड निघाली आईची कावड निघाली
कावड निघाली आईची कावड निघाली

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*